**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# केवळ पुस्तकी नव्हे तर प्रयोगशील केंद्रीत शिक्षण मिळावं - कुलगुरू डॉ.टी.व्ही. कट्टीमणी

## विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रारुपावर परिसंवाद संपन्न

अमरावती.

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण देवून चालणार नाही तर प्रयोगशील केंद्रीत शिक्षण मिळायला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मसुदा समितीचे सदस्य तथा अमरकंटक (म.प्र.) येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय जनजातीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.टी.व्ही. कट्टीमणी यांनी केले. विद्यापीठात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रारुप २०१९' वर आयोजित परिसंवादात बीजभाषण करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख उपस्थित होते.

डॉ. कट्टीमणी म्हणाले, सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये आमुलाग्र परिवर्तन आणायचे आहे. आधी ज्ञानार्जनासाठी शिक्षण ही व्यवस्था होती. मुगल व इंग्रजांच्या काळामध्ये ती व्यवस्था बदलली. भारताला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे पूर्ण झालीत, असे असले तरी भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल आपल्याला अद्यापही करता आला नाही. आजच्या शिक्षणपद्धतीत अनेक त्रुट्या आहेत, त्या दूर व्हायला पाहिजे.

देशात अनेक समस्यां आहेत. जलसंवर्धन, स्वच्छ भारत - स्वस्थ भारत, कौशल्यपूर्ण कलेचे ज्ञान, संस्कार अशाप्रकारच्या अनेक भारतीय गुरूकुल शिक्षण पद्धतीचा समावेश अभ्यासक्रमात असायला हवा होता. प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच दिल्या गेले पाहिजे, कारण मातृभाषेतून दिलेले शिक्षण विद्यार्थ्यांचे भरीव ज्ञानवाढीस मोलाची मदत करते. असे असले तरी आजवर ते होवू शकले नाही, केवळ पुस्तकी शिक्षणच दिल्या गेले, ही व्यवस्था बदलून प्रयोगशील केंद्रीत शिक्षण आमच्या विद्यार्थ्यांना कसे दिल्या जाईल, हे महत्वाचे आहे. ज्या व्यक्ती शिक्षित नाही; पण त्यांचेकडे कला व ज्ञान आहे, त्या कलांचा समावेश सुद्धा अभ्यासक्रमात करता येवू शकतो. छोटेछोटे प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरु करता येवू शकतात. त्या माध्यमातून अनेक रोजगाराच्या संधी सुद्धा उपलब्ध होवू शकतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रारुप हे सरकारचे नव्हे; तर समाजाचे व्हावे, याकरीता समाजाच्या सूचना महत्वाच्या असून त्या आधारावर समाजाभिमुख राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार होण्यास हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी यापूर्वी अनेक आयोगांची स्थापना करण्यात आली, असे असले तरी जी.ई.आर. अद्यापही कमीच आहे. समाजाभिमुख संशोधन वाढीस लागण्याची गरज आहे. आऊटकम बेस्ड एज्युकेशन सिस्टीम महत्वाची आहे. देशभरातील चाळीसहजार संस्थांचे रुपांतर पंधराहजार संस्थांमध्ये भविष्यात होणार आहे. नवीन धोरणामुळे महत्वपूर्ण बदल शिक्षण व्यवस्थेत होणार आहेत.

शिक्षणपद्धतीमध्ये प्रवेशयोग्यता, परवडणारे, एकसमान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अशाप्रकारची व्यवस्था असण्याची गरज आहे. गुरूकुल पद्धतीतील गुरुला पहिल्या स्थानावर आणण्याची खऱ्याअर्थाने गरज आहे. परिसंवादामध्ये अनेक महत्वपूर्ण सूचना विद्यापीठाला प्राप्त झाल्यात, त्या शासनाला पाठविण्यात येईल, असे याप्रसंगी कुलगुरूंनी सांगितले.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. कर्मयोगी संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी कुलगुरू डॉ.टी.व्ही. कट्टीमणी यांचा शाल, श्रीफळ देवून कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला. मान्यवरांचे पुस्तक देवून स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले. याप्रसंगी न्यु इन्स्टिट्युशनल आर्किटेक्चर, फोकस ऑन हाय क्वॉलिटी लिब्रल एज्युकेशन, क्रिएटींग अ कन्डक्टीव्ह लर्नींग एनव्हायर्मेन्ट, एनरजॅइस्ड, एन्गेज्ड ॲण्ड कॅपेबल फॅकल्टी, एम्पॉवर्ड गव्हर्नन्स ॲण्ड ॲटॉनॉमी, ट्रान्सफॉरमेशन ऑफ द रेग्युलॅरिटी सिस्टीम या मुद्द्यांवर प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास सपकाळ, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अविनाश मोहरील, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मनिषा काळे, ह.व्या.प्र.मं. चे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे यांनी विषयाच्या अनुषंगाने पी.पी.टी. द्वारे उत्कृष्टरित्या मार्गदर्शन केले.

याप्रसंगी यवतमाळ येथील अधिसभा सदस्य डॉ. नितीन खर्चे, डॉ. संगिता बिहाडे, प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे, डॉ. बबन झारे, डॉ.सौ. चिंचमलातपुरे आदींकडून प्राप्त झालेल्या सूचनांवर भाष्य केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रारुपामध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक मान्यवरांच्या सूचना सुद्धा विद्यापीठाला प्राप्त झाल्यात. त्या भारत सरकारला पाठविण्यात येणार आहे. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या डॉ. अनिता पाटील यांनी, तर आभार विकास विभागाचे उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे यांनी मानले. परिसंवादाला पाचही जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, तज्ज्ञ, शिक्षक तसेच विद्यापीठाचे विभागप्रमुख, शिक्षण, अधिकारी उपस्थित होते.

परिसंवादाचे लाईव्ह प्रसारण व्हर्च्युअल सी-फोर वरुन समन्वयक तथा मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे यांच्या मार्गदर्शनाखाली हार्डवेअर इंजिनिअर संदीप त्रिपाठी व चमूने केले.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. २५/०७/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 203